सामुदायिक विज्ञान महाविद्यालय
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र) भारत

डॉ. जया रवींद्र बंगाळे
सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य

महाविद्यालय **E-mail : adp.ccs.pbn@gmail.com** दुरध्वनी क्र. ०२४५२-२३३२६०

जा.क्र./एचपीपी/भांडार/१९४५/२०२५ दि. २१.०३.२०२५

## जाहीर प्रगटन

सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, वनामकृवि, परभणी अंतर्गत असलेल्या वर्षा मुलींच्या वसतिगृहातील खानावळ (मेस) भाडेतत्वावर चालविण्याकरीता इच्छुक असलेल्या भोजनालय/मेस व्यवसाय धारकाकडुन एक वर्ष कालावधीसाठीचे दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तेव्हा या जाहीर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरील खानावळ/मेस भाडेतत्वावर घेण्यासाठीच्या दराचे दरपत्रक या कार्यालयास विना विलंब दि. २८.०३.२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावी.

विहित कालावधीनंतर प्राप्त होणारे दरपत्रक स्विकारले जाणार नाहीत, दरपत्रक बंद पाकीटात सादर करुन त्यावर सादर केल्याचा दिनांक व पत्र क्रमांक स्पष्ट नमुद करावा. तसेच कोणतेही कारण न दाखवता दरपत्रक रद्द करण्याचा अधिकार समितीने राखुन ठेवलेला आहे याची नोंद घ्यावी.

सोबत : १. नियमावली
२. मेनू

सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य तथा
वसतिगृह अधिक्षिका, वर्षा मुलींचे वसतिगृह
सामुदायिक विज्ञान महाविद्यालय
वनामकृवि, परभणी

प्रत:

१. सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य कृषि महाविद्यालय/अन्नतंत्र/ कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान/उद्यानविद्या, परभणी
यांना सदरील जाहीर प्रगटन सूचना फलकावर प्रसिध्द करण्याची विनंती करण्यात येते.
२. विद्यार्थी कल्याण अधिकारी कार्यालय, वनामकृवि, परभणी यांना सदरील जाहीर प्रगटन सूचना फलकावर प्रसिध्द करण्याची विनंती करण्यात येते.
३. सूचना फलक, सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, वनामकृवि, परभणी
४. सर्व मुलींचे वसतिगृह, वनामकृवि, परभणी यांना देवून सुचना फलकावर प्रसिध्द करण्याची विनंती करण्यात येते.

# सामुदायिक विज्ञान महाविद्यालय
## वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
## परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र) भारत

डॉ. जया रवींद्र बंगाळे
सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य

महाविद्यालय **E-mail : adp.ccs.pbn@gmail.com** दुरध्वनी क्र. ०२४५२-२३३२६०


जा.क्र./एचपीपी/भांडार/१९४५/२०२५ दि. २१.०३.२०२५

व्यवसाय धारकांकडून वर्षा मुलींच्या वसतिगृहातील खानावळीत पुरवठा करण्यासाठी भोजनथाळी

| अ.क्र. | तपशिल | दर |
|---|---|---|
| १ | **भोजन थाळी** : वरण, भात, पोळी, भाजी (प्रति दिन दोन वेळा सकाळी व रात्री) | |
| २ | **सलाद** : लोणच, पापड, टॉमेटो, गाजर, काकडी, कांदा व लिंबू | |
| ३ | **स्वीट** : बालूशाही, गुलाबजाम, शिरा व जिलेबी इत्यादि (महिन्यातून किमान एक वेळ) | |

सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य तथा
वसतिगृह अधिक्षिका, वर्षा मुलींचे वसतिगृह
सामुदायिक विज्ञान महाविद्यालय
वनामकृवि, परभणी

# सामुदायिक विज्ञान महाविद्यालय
# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
# परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र) भारत

डॉ. जया रवींद्र बंगाळे
सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य

महाविद्यालय E-mail : adp.ccs.pbn@gmail.com दुरध्वनी क्र. ०२४५२-२३३२६०


जा.क्र./एचपीपी/भांडार/ १९८५ /२०२५ दि. २१.०३.२०२५

नियमावली :

१. वसतिगृहातील खानावळ (मेस) चालकास अन्न व औषध प्रशासन विभागाकडून (Food Safety & Standard Authority of India) खानावळ चालविण्यासाठी आवश्यक असणारे प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आले आहे.

२. अनामत रक्कम रु. ५,०००/- धनाकर्ष स्वरुपात नियंत्रक, वनामकृवि, परभणी यांच्या नावे सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, परभणी यांचे कार्यालयात जमा करण्यात यावी.

३. खानावळ (मेस) चालविण्यासाठी वापरण्यात येणारे स्वयंपाकगृह व भोजनकक्ष यांचा किराया म्हणून रु. २,०००/- (अक्षरी दोन हजार केवळ) प्रति महिना नियमित भरणा करावा लागेल.

४. खानावळ (मेस) चालविण्यासाठी वापरण्यात येणारी स्वयंपाकगृह/भोजनकक्ष परिसरात वापरण्यात येणारे विद्यूत साहित्य उदाहरण टयुब लाईट, एल.ई.डी. लॅम्प (प्रकाश दिवे), छतांचे पंखे हे वसतिगृह कार्यालयामार्फत सुरवातीस एक वेळेस देण्यात येतील. त्या नंतर टयुब लाईट, एल.ई.डी. लॅम्प (प्रकाश दिवे), खराब (शॉट) झाल्यास खानावळ चालकांस पुन्हा लावावी लागतील.

५. खानावळ (मेस), मध्ये वसतिगृह प्रशासनामार्फत देण्यात येणारी फर्निचर साहित्य उदा. टेबल, खुर्ची, छतांचे पंखे, भांडे ईत्यादी सर्व मालमत्तेची योग्य ती काळजी घ्यावी लागेल. सदर फर्निचर साहित्य/वस्तु खराब, तुटफुट, गहाळ, चोरी झाल्यास त्यांची संपूर्ण रक्कम एकरक्कमी आपल्या अनामत रक्कमेतुन परस्पर कपात करुन नुकसान भरपाई म्हणून घेण्यात येईल व फर्निचर साहित्य/वस्तु वस्तुंची किंमत अनामत रक्कमेपेक्षा अधिक होत असल्यास त्यांची संपूर्ण रक्कम एकरक्कमी नुकसान भरपाई म्हणून भरणा करावी लागेल.

६. महाराष्ट्र दुकाने व संस्था नियम १९६१ च्या नियम ६ अन्वये संस्थेचा खानावळ (मेस) शासन नोंदणी दाखला नमुना ड खानावळ (मेस) चालकास बंधनकारक राहील.

७. खानावळी मध्ये केवळ संबंधित वसतिगृहाच्या विद्यार्थ्यांनाच भोजन देण्यात येईल. बाहेरील व्यक्तिस/विद्यार्थ्यांस खानावळ मध्ये भोजन देता येणार नाही.

८. भोजनकक्षामध्ये/स्वयंपाक खोलीमध्ये,भोजनकक्ष परिसरात नियर्मित स्वच्छता ठेवणे बंधनकारक राहील.

९. जेवण ताजे सकस व योग्य रित्या शिजवलेलेनियमित नियोजीत वेळेत विद्यार्थ्यांना द्यावे लागेल.

१०. खानावळ (मेस) चालविण्यासाठी बाजारातुन आनलेला भाजीपाल, फळभाज्या, फळे ई. सर्व साहित्याची वर्गवारी करुन ते निवडुन योग्य दर्जाचे पाहुन स्वयंपाकास वापरावे.

११. खानावळीमध्ये देण्यात येणारे पदार्थ योग्य त्या पध्दतीने झाकुन ठेवावे लागतील.

१२. खानावळीमध्ये स्वयंपाक करणारे स्वयंपाकी यांनी योग्य ती स्वच्छता राखुन स्वयंपाक करावा लागेल.

१३. खानावळ (मेस) मध्ये दैनंदिन वापरातील पाणी आणि पिण्याचे पाणी यांची वर्गवारी करुन ते स्वच्छ राहील या हेतुने वेगवेगळया ठिकाणी झाकुन ठेवल्या जाईल यांची काळजी घ्यावी लागेल.

१४. खानावळ (मेस) मध्ये अन्न पदार्थ नियमित नियोजीत जागेत त्यावर माश्या, किटक ईत्यादी बसणार नाहीत. या दृष्टीने झाकुन ठेवावे लागेल.

१५. सर्व विद्यार्थ्यांचे भोजना नंतर उरलेले, शिळे अन्न यांची योग्यती विल्हेवाट लावणे बंधनकारक राहील. उष्टे, खरकटे उरलेले अन्न ईतरत्र उघडयावर अथवा नालीमध्ये टाकता येणार नाही.

१६. खानावळ (मेस) मध्ये व्यावसायिक गॅसचा वापर करावा. लाकडाचा वापर करु नये.

१७. खानावळ (मेस) मध्ये वापरण्यात येणारे तेल, दाळी, मसाला पदार्थ इत्यादी सर्व साहित्य योग्य त्या दर्जाचे आणि प्रमाणिक मानकानुसारच वापरावे लागेल.

१८. विद्यार्थ्यांना भोजन, तसेच वापरण्यात येणारी भांडी, तत्सम साहत्य/वस्तु नियमित स्वच्छ राहतील यांची दक्षता घ्यावी लागेल व ती नियोजीत जागेत ठेवावी लागेल. त्यावर धुळ, माश्या, किटक ईत्यादी बसुन घाण करणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

१९. खानावळ (मेस) नियमित स्वच्छता राहील याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी लागेल उदा. फरशी पुसणे, जाळे काढणे, भिंतीची स्वच्छता राखणे, खिडक्या तावदाने ईत्यादी दैनंदीन साफसफाई ठेवावी लागेल.

२०. खानावळ (मेस) मधील वातावरण प्रसन्न, आनंदी आल्हाददायक व शांततेचे राहील यांची काळजी घ्यावी लागेल.

२१. खानावळ (मेस) मध्ये असलेल्या फर्निचरची योग्य ती निगा राखुन स्वच्छता ठेवावी लागेल.

२२. खानावळ (मेस) मध्ये कोणताही अनुचित प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२३. खानावळ (मेस) बंद करण्याचा अधिकार सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य, सामुदायिक_ विज्ञान महाविद्यालय, वनामकृवि, परभणी यांना राहील.

२४. खानावळ (मेस) बंद करण्यापूर्वी वसतिगृह प्रशासना मार्फत देण्यात येणारी फर्निचर/भांडी वस्तु/साहित्य ईत्यादी वस्तु विनाविलंब संबंधित वसतिगृह सहायक यांच्याकडे जमा करणे बंधंनकारक राहील.

२५. खानावळ (मेस) मध्ये अन्नातुन विषबाधा झाल्यास संपूर्ण जबाबदारी खानावळ (मेस) चालकची राहील.

२६. खानावळ (मेस) परिसरात योग्य तो प्रकाश ठेवावा लागेल.

२७. विद्यार्थ्यांमध्ये सलोख्याचे वातावरण राहील याबाबत खानावळ (मेस) चालकांने काळजी घ्यावी.

२८. काही अपवादात्मक विद्यार्थ्यांकडुन क्वचित प्रसंगी खानावळ (मेस) चालविण्यासाठी काही अडचणी येत असल्यास प्रत्यक्ष वसतिगृह अधिक्षक यांच्याशी संपर्क करुन अथवा लेखी स्वरुपात रितसर आपले म्हणणे सादर करावे.

२९. संबंधित वसतिगृह सहायक यांच्याकडे समस्या व अडचणी याबाबत लेखी स्वरुपात कळविण्यात याव्यात.

३०. भोजनाचा, कमी किंमत/दर या तत्वावर निविदा/दरपत्रके धारकांस खानावळ (मेस) चालविण्यास देण्यात येतील.

३१. खानावळ चालवण्यासाठीचा सदर करार एक वर्ष करीता राहील.

३२. खानावळ (मेस) मध्ये काम करणाऱ्या कामगाराची वैयक्तीक माहिती आधार कार्डसह सादर करणे बंधनकारक राहील.

३३. खानावळ (मेस) मध्ये बालकामगार ठेवता येणार नाहीत.

३४. खानावळ (मेस) मध्ये कामगाराकडुन कामगार कायद्यानुसार कामे करावी लागतील.

३५. खानावळ (मेस) मध्ये मेनु कार्ड ठेवणे बंधनकारक राहील.

३६. कामगारास ईजा दुखापत अथवा अपघात झाल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी खानावळ (मेस) चालकांची राहील.

३७. खानावळ (मेस) चालकांस रु. ५००/- चे बंधपत्रावर नियम अटी/शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

३८. अटी व शर्तीचे पालन न केल्यास अथवा प्रशासनाच्या नियमांचा भंग केल्यास कोणत्याही क्षणी खानावळ (मेस) कंत्राट रद्द करण्याचे अधिकार मा. सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य, सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, वनामकृवि, परभणी यांनी राखुन ठेवले आहेत.

सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य तथा
वसतिगृह अधिक्षिका, वर्षा मुलींचे वसतिगृह
सामुदायिक विज्ञान महाविद्यालय
वनामकृवि, परभणी